सम्राट अशोकाचे भारतातील स्तंभ

अशोक तपासे

संपर्क दुरध्वनी आणि व्हॉटस्ॲप
९९६९११२११३ - ९९३०११२११३

आजवर भारतात पस्तिस ठिकाणी अशोकाचे स्तंभ आणि शिलालेख सापडले आहेत. या पैकी दहा ठिकाणी स्तंभ तर उरलेल्या ठिकाणी शिलालेख आहेत. सम्राट अशोकाच्या स्तंभांचे कांही स्तंभ-विशेष आहेत. या स्तंभांचा घेर पायथ्याशी सुमारे तीन ते साडेतीन फुट असतो आणि तो वर निमुळता होत जातो. स्तंभाची उंची सामान्यपणे पस्तीस फुटांहून अधिक सुमारे साठ फुटांपर्यंत आहे. स्तंभाच्या वरच्या टोकावर सुंदर नक्षीदार चौथरा व त्यावर एका प्राण्याची रेखीव प्रतिमा असते. शिरोभागीच्या या रचनेला स्तंभशीर्ष म्हटले जाते. स्तंभावर ब्राम्हि लिपीत लेखन कोरलेले असते. आज उपलब्ध असलेल्या अनेक स्तंभावर या तीन स्तंभ-विशेषांपेकी कांही स्तंभ विशेष उपलब्धच नाहीत. काळाच्या ओघात ते नष्ट झाले आहेत.

वरील वर्णनातील दहा स्तंभां व्यतिरीक्त चार ठिकाणी म्हणजे गोठीवहा (नेपाळ), बोधगया (गया), पाटलीपुत्र (पाटणा) व अमरावती (आंध्र प्रदेश) येथे स्तंभांचे अधिकच लहान असे अवशेष सापडले आहेत. तसेच हरियाणा मधील फतेहबाद आणि हिस्सार या ठिकाणी दोन स्तंभ मिळाले असुन त्यांच्यावर इस्लामी अतिक्रमण झाले आहे. सध्या ते मशीदीच्या आवारात मिनार म्हणून उभे आहेत. या स्तंभावर आज लेख दिसत नाहीत.

एक स्तंभ जो उत्तर प्रदेशातील संकिस्सा या गावाजवळ होता जो आज उपलब्ध नाही तर फक्त स्तंभावरील हत्तीचे स्तंभ-शीर्ष शिल्लक आहे. मिरत स्तंभ जो आज नवी दिल्लीतील बडा हिंदुराव इस्पितळा समोर आहे, सुमारे सहा तुकडे एकत्र जोडून (सर अलेक्झांडर कनिंघहॅम यांनी) स्थापित केला आहे. यावर स्तंभशीर्ष नाही. टोपरा येथे सापडलेला स्तंभ फिरोजशहा तुघलख याने उखडून दिल्लीतील त्याच्या वाड्यावर रोवला आहे. यावरचे स्तंभशीर्ष

देखील काळाच्या ओघात नष्ट झाले आहे. परंतु हा एकमेव स्तंभ आहे ज्यावर सातवा मोठा स्तंभलेख आहे. सांची आणि सारनाथ येथील स्तंभांचे तुकडे झालेले असुन फक्त लेख असलेला तुकडा उभा स्थापित केलेला आहे व (चार सिंहांचे) स्तंभशीर्ष तेथील पुराणवस्तु संग्रहालयात ठेवले आहे. रामपुरवा (बिहारच्या उत्तर भागात) येथे दोन स्तंभ आडवे ठेवलेले आहेत. पैकी एकावर शिलालेख आहे व जवळ सापडलेले (बैलाचे) स्तंभशीर्ष राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात ठेवलेले आहे. रामपुरवा, लौरिया नंदनगढ, लौरिया अरेराज हे तीन स्तंभ बिहार मधे सुमारे शंभर किलोमीटरच्या अंतरात सरळ रेषेत आहेत त्यामुळे केवळ एकाच दिवसात हे स्तंभ पहाता येतात. या तीनही स्तंभांवर प्रत्येकी सहा स्तंभलेख आहेत. या तीनही स्तंभांजवळ ऐतिहासीक शाल-वृक्ष आहेत. नंदनगढ आणि अरेराज येथील स्तंभांवरील सर्व सहा लेख सुस्पष्ट स्थीतीत आहेत. याच सरळ रेषेत बरेच दक्षिणेकडे वैशाली स्तंभ (कोल्हुवा गावा जवळ) आहे. या स्तंभावर बसलेल्या सिंहाचे स्तंभशीर्ष आहे परंतु स्तंभलेख नाही. नेपाळ मधील निगलीहवा स्तंभ दोन तुकडे झाला आहे व एका तुकड्यावर लेख आहे. नेपाळ मधीलच लुंबिनी स्तंभ मायादेवी मंदिराजवळ उभा असुन यावरही लेख आहे पण स्तंभशीर्ष नाही. कौशांबि येथील एक स्तंभ बादशहा अकबर याने तेथुन उखडून अलाहाबाद येथील आपल्या किल्ल्यात रोवला आहे. यावर असलेले लेख त्याच्या दरबारातील नवरत्नांना आणि राज्यातील कोणालाही वाचता न आल्याने या लेखातील सहा ओळी खरवडून काढल्या आणि तेथे अरबी भाषेतील कुराणातील ओळी लिहविल्या.

स्तंभावरील लेखांचे लघु स्तंभलेख व विशाल स्तंभलेख असे दोन प्रकार सांगता येतील. या पैकी लघु स्तंभलेखांत सांचि व सारनाथ स्तंभावर संघाला दुषीत करणाऱ्या भिक्षु आणि भिक्षुणींना संघाच्या वास्तव्या पासून दुर करावे व संघ शुद्ध ठेवावा अशा आज्ञा आहेत. नेपाळ मधील निगलीहवा स्तंभावर कोणागमना स्तुपासंबंधी माहिती दिली आहे तर नेपाळ मधीलच लुंबिनी स्तंभावर बुद्धांच्या जन्मस्थानाचा उल्लेख आहे आणि या गावचा कर कमी करुन आठ भागा इतकाच ठेवला आहे असे सांगीतले आहे. स्तंभावरील विशाल स्तंभलेख म्हणजे सहा लेखांची शृंखला असुन ही शृंखला मिरत,

रामपुरवा, लौरिया नंदनगढ, लौरिया अरेराज या स्तंभावर असुन टोपरा (फिरोजशहा कोटला, दिल्ली) स्तंभावर सहा लेखांच्या शृंखले नंतर सातवा स्तंभलेख आहे.

अशोक स्तंभाचे तीनही स्तंभ विशेष एकाश्म स्तंभ, स्तंभशीर्ष, आणि स्तंभलेख सुस्थितीत असलेला स्तंभ म्हणजे लौरिया नंदनगढ स्तंभ. बिहारमधील बेतिया शहराच्या उत्तरेस सुमारे सव्वीस किलोमीटर अंतरावर हा स्तंभ आहे. रामपपुरवा ते कोल्हुवा (वैशाली) या सरळ रेषेतील स्तंभांपैकी हा दुसरा स्तंभ आहे. यावर वैशाली स्तंभासारखेच बसलेल्या सिंहाचे स्तंभशीर्ष आहे.

रामपुरवा ते वैशाली हे सरळ रेषेतील चार स्तंभ, मिरत आणि टोपरा हे दोन दिल्लीतील विशालकाय स्तंभ, सांची व सारनाथ हे स्तुपा जवळचे स्तंभ आणि तथागतांच्या जन्मस्थळाजवळचा लुंबिनी स्तंभ हे नऊ स्तंभ आम्हि पाहिले आणि त्यांची छायचित्रेही घेतली. अलाहाबाद किल्ला हा भारतीय लष्कराच्या ताब्यात असून याच किल्ल्यात लष्कराचे शस्त्रागार असल्याने या स्तंभाजवळ पोचणे दुरापास्त होते. तरीही लष्कराच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याची विशेष परवानगी, छायाचित्र न काढण्याच्या अटीवर मिळविली आणि आम्ही अलाहाबाद (मुळचा कौशांबी) स्तंभ देखील पाहिला. अशोक स्तंभांच्या या प्रवासावर आधारीत एक चित्रमालिका मी तयार केली असुन ती आपणास www.youtube.com/c/PiyadassiAsok या संगणक-महाजाल संकेतस्थळावर पहाता येईल. सम्राट अशोकाच्या सर्वच शिलालेखांचे व स्तंभलेखांचे मुळचे ब्राम्हि लेख (रेखा चित्र), देवनागरी लिप्यांतर व मराठी भाषांतर असे माझे पुस्तक “पियदसि राजा हेवं आहा ...” या पुस्तकातील विशाल स्तंभलेख क्रमांक १ ते ७ यांचे देवनागरी लिप्यांतर आणि मराठी भाषांतर पुढे देत आहे.

# देहली - टोपरा स्तंभ – उत्तर पृष्ठ		मुळ ब्राम्हि लेख १,२ व ३



देवनागरी लिप्यांतर

1. देवानंपिये पियदसि लाजहेवंआहा सडुविसति
2. वस अभिसितेनमे इयंधंमलिपि लिखापिता
3. हिदतपालते दुसंपटिपादये अंनतअगायाधंमकामताया
4. अगायपलिखाया अगायसुसूसाया अगेनभयेना
5. अगानउसाहेना एसचुखोमम अनुसथिया
6. धंमपेखा धंमकामताचा सुवेसुवेवढिता वढीसतिचेवा
7. पुलिसापिचमे उकसाचा गेवयचा मझिमाचा अनुविधीयंती
8. संपटीपादयंतिचा अलंचपलंसमादपयितवे हेमेवाअंत
9. महामातापि एसहिविधि याइयंधंमेनपालना धंमेनविधाने
10. धंमेनसुखियना धंमेनगोतीति देवानंपिये पियदसिलाज
11. हेवंआहा धंमेसाधू काायंचधंमेति अपासिनवे बहुकयाने
12. दयादाने सचेसोचये चखुदानेपिमे बहुविधेदिंने दुपद
13. चतुपदेसु पखिवालिचलेसु विविधेमेअनुगहेकटे आपान
14. दाखिनाये अंनानिपिचमेबहूनि कयानानिकटानि एतायेमे
15. अथाये इयंधंमलिपिलिखापिता हेवंअनुपटिपजंतु चिलं
16. थितिकाचहोतूतिति येचहेवंसंपटिपजीसति सेसुकटंकछतिति
17. देवानंपिये पियदसिलाजहेवंअहा कयनंमेवदेखतिइयंमे
18. कयानेकटेति नोमिनपापंदखति इयंमेपापकटेति इयंवाआसिनवे
19. नामाति दुपटिवेखेएसा हेवंचुखोएसदेखिये इमानि
20. आसिनवगामीनिनाम अथचंडिये निठुलिये कोधेमाने इस्या
21. कालनेनवहकं मापलिभसयिसं एसबाढदेखिये इयंमे
22. हिदतिकाये इयंमउमे पालतिकाये

टिप :- येथे प्रत्येक ओळीला मुद्दमच क्रमांक दिला आहे जेणेकरून हे लक्षात यावे की दहाव्या क्रमांकाच्या ओळीत तिसऱ्या शब्दापासून दुसरा लेख सुरू होतो आणि सतराव्या ओळीत पहिल्या शब्दापासून तिसरा लेख सुरू होतो.

या लेखात व पूढील सर्वच लेखात अधोरेखित केलेली अक्षरे प्राकृत शब्द-वाक्य करताना चुकल्या सारखी वाटतात पण हे केवळ क्षतिग्रस्ततेमुळे असावे. ब्राम्हि अक्षरांच्या निरिक्षणातून वाचकांच्या हे निश्चितच ध्यानी यावे.

मराठी भाषांतर

स्तंभलेख १.

देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. अभिषेकानंतर सव्वीस वर्षांनी मी हा धम्मलेख लिहविला. सुयोग्य मार्गाचे रक्षण आणि अनुकरण करणे, श्रेष्ठतम धम्म-कमना, श्रेष्ठतम (कठोर) परिक्षा, श्रेष्ठतम सुश्रुषा, अत्याधिक भय (अगम्यतेची कल्पना असणे), अत्याधिक उत्साह या गोष्टी अशक्यप्राय (अति-कठिण). असे मी अनुशासितो की धम्म-अपेक्षा, धम्म-कामना दिवसो-दिवस वाढत जावी आणि वाढतच रहावी. माझी माणसे, उच्च श्रेणीतील, निम्न श्रेणीतील आणि मध्यम श्रेणीतील, योग्य मार्गाने अनुपालन (कार्यान्वयन) करतील, ज्या योगे ते इतरांना प्रेरित करतील. असेच माझे सीमावर्ती महामात्रही (करतील). या कर्तव्याने हे धम्म-पालन. (सर्वांना) धम्माने सौख्य मिळो, (सर्वांचे) धम्माने रक्षण होवो.

स्तंभलेख २.

देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. धंम श्रेष्ठ आहे (पण) धम्म काय आहे ? अकुशल (वाईट) पासून दूर रहावे, खुप सत्कर्म करावे, (जसे) दया, दान, सत्य, शुचिता. मी अनेकदा दृष्टी दान (दृष्टी-दान – ज्ञान दान) केले आहे. द्विपाद, चतुष्पाद, पक्षी आणि जलचरांना जीवन (पाणी) दाक्षिण्य केले आहे. अशा प्रकारची अनेक कुशल (चांगली) कामे केली आहेत. या साठीच मी हा धम्म-लेख लिहवीला आहे की याचे अनुकरण करावे, आणि हे (अनुकरण) चिरस्थापित व्हावे.

स्तंभलेख ३.

देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. (मनुष्य) सत्कृत्य पहातो, (की) मी हे सत्कर्म केले. दुष्कृत्य पहात नाही, (की) मी हे दुष्कर्म केले किंवा हे काम आश्रवाचे (अकुशल किंवा दूर्गुणाचे, क्लेशकारी) आहे. आत्मनिरीक्षण करणे खुप कठीण आहे. (परंतु) याकडे असे पहावे. दुष्टता, निष्ठूरता, क्रोध, अभिमान, इर्ष्या हे क्लेशकडे नेणारे आहे. या कारणाने मी परिभ्रमित होऊ नये. हे अधिक्याने जाणावे (की) हे माझ्यासाठी ऐहिक (या लोकीचे) (सुखाचे) आहे आणि ते (याहून वेगळे) माझ्यासाठी पारलौकीक (सुखाचे) आहे.

देहली - टोपरा स्तंभ – पश्चिम पृष्ठ मुळ ब्राम्हि लेख ४

WEST



देवनागरी लिप्यांतर

1. देवानंपिये पियदसिलाजाहेवंआहा सडुविसतिवस
2. अभिसितेनमे इयंधंमलिपिलिखपिता लजुकामे
3. बहूसुपानसतसहसेसु जनसिआयता तेसंयेअभिहालेव
4. दंडेवा अतपतियेमेकटे किंतिलजूका अस्वथअभीता
5. कंमानिपवतयेवू जनसजनपदसा हितसुखंउपदहेवू
6. अनुगहिनेवुचा सुखियन दुखियनंजानिसंति धंमयुतेनच
7. वियोवदिसंति जनंजानपदं किंतिहिदतंच पालतंच
8. आलाधयेवूति लजुकापिलघंति पटिचलतवेमं पुलिसानिपिमे
9. छदंनानिपटिचलिसंति तेपिचकानिवियोवदिसंति येनमंलजूका
10. चघंतिआलाधयेतवे अथाहिपजं वियतायेधातिये निसिजितु
11. अस्वथेहोति वियतधाति चघतिमेपजं सुखंपलिहटवे
12. हेवंममालजूकाकटा जानपदसहितसुखाये येनएतेअभिता
13. अस्वथसंतं अविमनाकंमानिपवतयेवूति एतेनमेलंजूकान
14. अभिहालेवदंडेवा अतपतियेकटे इछितवियेहिएसाकिंति
15. वियोहालसमताचसिय दंडसमताच अवइतेपिचमेअवुति
16. बंधनबधानंमुनिसानं तीलितदंडानं पतवधानं तिंनिदिवसानिमे
17. योतेदिंने नातिकावकानि निझपयिसंति जीवितायेतानं
18. नासंतंवानिझपयिता दानंदाहंतिपालतिकं उपवासंवकछंति
19. इछाहिमेहेवंनिलुधसिपिकालसि पालतंआलधयेवूति जनसच
20. वढतिविविधेधंमचलने सयमे दानसविभागेति

मराठी भाषांतर – स्तंभलेख ४.

देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. अभिषेकानंतर सव्वीस वर्षांनी मी हा धम्मलेख लिहविला. माझे रज्जुक (सम्राट अशोकाचे राजकिय अधिकारी) अनेक लक्ष प्राणि आणि लोकांमधे नेमलेले आहेत. त्यांनी वरदान द्यावे कि शिक्षा द्यावी हे (त्यांच्या) स्व-हेतु (आत्म-विवेका) वर ठेवले आहे. का ? रज्जुकांनी आश्वस्त आणि निर्भयपणे कार्यप्रवृत्त व्हावे व जनते साठी देशा साठी हित-सुख उपलब्धीचा अनुग्रह करावा. ते (जनतेचे) सुख-दुःख जाणतील आणि धंमयुक्तांना (धम्मा प्रमाणे वागणाऱ्यांना) प्रेरित करतील ज्या योगे ते (धम्मयुक्त) इहलोकात व परलोकात प्रसन्न होतील. रज्जुक माझ्या आज्ञापालनास उत्सुक असतात. माझे (राज)पुरुष (अधिकारी) माझ्या इच्छेनुसार परिचर करुन अनेक प्रेरणा देतील यामुळे माझे रज्जुक मला प्रसन्न करण्यास समर्थ होतील. जसे (कोणी) आपत्य कुशल दाईकडे सोपवून आश्वस्त होतो की ही कुशल दाई माझ्या आपत्याचे सुखकर पालन करण्यास समर्थ आहे, अशाच प्रकारे मी देशाच्या हित-सुखासाठी रज्जुक नियुक्त केले आहेत. रज्जुकांनी निर्भय, आश्वस्त व शांतचित्त होउन प्रसन्नतेने कार्य करण्यास प्रवृत्त असावे म्हणून त्यांनी वरदान द्यावे कि शिक्षा द्यावी हे मी (त्यांच्या) स्व-हेतु (आत्म-विवेका) वर ठेवले आहे. हे माझ्या इच्छेनुसार आहे, का ? कारण व्यवहार-समता आणि शिक्षा-समता असावी (व्यवहारात व शिक्षेत पक्षपात नसावा). माझा आदेश आहे की जे बंदिवान आहेत त्यांना तोलुन (विचारपूर्वक) शिक्षा द्यावी आणि ज्यांना मृत्यूदंड दिला आहे त्याची सुचना तीन दिवस पूर्व मला द्यावी. या दिवसात नातेवाइक वा इतर अनेक त्याच्या जीवीताकडे (पुनर्विचारास्तव) ध्यानाकर्षण करतील अथवा तसे ध्यानाकर्षण करु (शकणे) नसल्यास त्याच्या (पारलौकिक) संरक्षणासाठी दान देणे किंवा उपवास करणे करतील. कारण माझी इच्छा आहे की बंदिवास-काळातही (त्यांनी) पार-प्रसन्न (पारलोकी सुखी) असावे. या प्रकारे लोकांमधे विविध प्रकारे धम्माचरण, संयम आणि योग्य-भागी (योग्य ठिकाणी) दान देणे यात वृद्धी होइल.

देहली - टोपरा स्तंभ – दक्षिण पृष्ठ मुळ ब्राम्हि लेख ५

SOUTH.



देवनागरी लिप्यांतर

1. देवानंपियेन पियदसिलाजहेवंअहा सडुवीसतिवस
2. अभिसितेनमे इमानिजातानि अवधियानिकटानि सेयथ
3. सुके सालिका अलुने चकवाके हंसे नंदीमुखे गेलाटे
4. जतुका अंबाकपीलिका दडी अनठिकमछे वेदवेयके
5. गंगापुपुटके संकुजमछे कफटसयके पंनससे सिमले
6. संडके ओकपिंडे पलसते सेतकपोते गामकपोते
7. सवेचतुपदे येपटिभोगंनोएति नचखादयती अजकना
8. एडकाचा सूकलीचा गभिनीवपायमीनाव अवधाय पातके
9. पिचकानि आसंमासिके वधिकुकुटे नोकटविये तसेसजीवे
10. नोझापेतविये दावेअनठायेवा विहिसायेवा नोझापेतविये
11. जीवेनजीवे नोपुसितविये तीसुचातुंमासीसु तिसायंपुंनमासियं
12. तिंनिदिवसानि चावुदसं पंनडसं पटिपदाये धुवायेचा
13. अनुपोसथ मछेअवधाये नोपिविकेतविये एतानियेवादिवसानि
14. नागवनसि केवटभोगसि यानिअंनानिपि जीवनिकायानि
15. नोहंतवियानि अठमिपखाये चावुदसाये पंनडसाये तिसाये
16. पुनावसुने तासुचातुंमासीसु सुदिवसाये गोनेनोनीलखितविये
17. अजके एडके सूकले एवापिअंने नीलखियति नोनीलखितविये
18. तिसाये पुनावसुने चतुंमासिये चातुंमासिपखाये अस्वसा गोनसा
19. लखने नोकटविये यावसडुवीसतिवस अभिसितेनमे एताये
20. अंतलिकाये पंनवीसति बंधनमोखानिकटानी

मराठी भाषांतर (स्तंभलेख ५)

देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. अभिषेकानंतर सव्वीस वर्षांनी मी सदर जीवांस अ-वध (घोषित) केले आहे. जसे पोपट, मैना, अरुण (लाल रंगाचा मोठा पोपट), चक्रवाक (उडणारा मोठा हंस), हंस, नंदीमुख (नंदा नदीच्या उगमा जवळ आढळणारा पक्षी), (विशीष्ठ प्रकारचे) बदक, वटवाघूळ, आम्रवृक्षावरील किटक (मुंग्या), लहान कासवे, विनाहाडाचे मासे, घुबड, नदीतील पाणकोंबडे, सोन-मासे, सारळ (शल्यक - एक काटेरी-प्राणी), जंगली ससे, बारशिंगी हरीण, ढोलीत किंवा दाट झाडीत किंवा ऊंच आकाशात रहाणारे पक्षी, श्वेत कपोत वा ग्राम कपोत, सर्व चतुष्पाद प्राणी जे खाण्यासाठी नव्हेतर केवळ मौजे खातर मारले जातात, गर्भार अथवा दूध पाजणाऱ्या शेळ्या, मेंढ्या, डुकरी किंवा त्यांची लहान पिल्ले आणि एक महिन्याहून लहान कोंबडे यांचे वध करू नयेत. कोणाही सजीवाला भुश्यात टाकून जाळू नये. विनाकारण अथवा प्राणि मारण्यासाठी जंगलात आग लावू नये. (एका) जीवावर (दूसऱ्या) जीवाचे पोषण होऊ नये. चातुर्मासातील (पावसाळ्यातील) तीन महिन्यांच्या आणि (तिसाय-तैष-पौष) पौष (महिन्याच्या) पौर्णिमा आणि प्रत्येक पक्षाची (पंधरवडा) चतुर्दशी, पंधरावा दिवस (आमावस्या / पौर्णिमा) व प्रतिपदा या दिवशी निश्चितपणे (नित्य-नेमाने) उपवास करावा व या दिवशी मासे मारू नयेत किंवा विकू नयेत. तसेच या दिवशी हत्ति-वनात (दाट जंगल, जिथे हत्तिंचा वावर आसतो) अथवा मासेमारी तलावात जे जीव रहातात, त्याना मारु नये (अर्थात या दिवशी दाट जंगलात वा मोठ्या तलावात शिकार करू नये). प्रत्येक पक्षातील (पंधरवडा) अष्टमी, चतुर्दशी, पंधरावा दिवस (आमावस्या / पौर्णिमा) आणि तिष्य व पुनर्वसु नक्षत्रात, चातुर्मासातील (पावसाळ्यातील) तीन महिन्यांच्या शुभदिनी (सणासुदी) बैलांना बडवू नये. तसेच बकरे, एडके, डुकरे व अन्य जे बडविले जातात, त्याना बडवू नये. तिष्य व पुनर्वसु मधे, चातुर्मासातील (पावसाळ्यातील) चार पक्षात (पौर्णिमेच्या दिवशी) बैल व घोड्यांना लक्ष करु नये (वध करु नये). हे अभिषेकानंतरचे सव्वीसावे वर्ष, या अंतराळात (अवधित) मी पंचवीस वेळा बंदिवानांना मुक्त केले आहे.

देहली - टोपरा स्तंभ – पूर्व पृष्ठ मुळ ब्राम्हि लेख ६, ७ (पुर्वार्ध)



देवनागरी लिप्यांतर

1. देवानंपिये पियदसिलाजहेवंअहा दुवाडस
2. वसअभिसितेनमे धंमलिपिलिखापिता लोकसा
3. हितसुखाये सेतंअपहाटा तंतंधंमवढिपापोवा
4. हेवंलोकसा हितसुखेतिपटिवेखामि अथइयं
5. नातिसु हेवंपतियासंनेसु हेवंअपकठेसु
6. किमंकानिसुखं अवहामीति तथचविदहामि हेमेवा
7. सवनिकायेसु पटिवेखामि सवपासंडापिमेपूजिता
8. विविधायपूजाया एचुइयंअतना पचुपगमने
9. सेमेमोख्यमते सडुवीसतिवस अभिसितेनमे
10. इयंधंमलिपि लिखापिता
11. देवानंपिये पियदसिलाजाहेवं आहा येअतिकंतं
12. अंतलं लाजाने हुसहेवं इछिसु कथंजने
13. धंमवढियावढेया नोचुजनेअनुलुपाया धंमवढिया
14. वढिथा एतं देवानंपिये पियदसिलाजा हेवंआहा एसमे
15. हुथा अ<u>ता</u>कंतंच अंतलं हेवं इछिसुलाजाने कथ जने
16. अनुलुपाया धंमवढिया वढेयाति नोचजने अनुलुपाया
17. धंमवढिया वढिथा सेकिनसु जने अनुपटिप<u>ज</u>या
18. किनसु जने अनुलुपाया धंमवढियावढेयाति किनसुकानि
19. अभ्युंनामयेहं धंमवढियाति एतंदेवानंपिये पियदसिलाजा हेवं
20. आहा एसमेहुथा धंमसावनानि सावापायामि धंमानुसथिनि
21. अनुसिसामि एतंजने सुतु अनुपटीपजीसतिअभ्युंनमिसति

मराठी भाषांतर

स्तंभलेख ६
देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. अभिषेकानंतर बारा वर्षांनी मी नीतीलेख लिहविले, लोकांच्या हित-सुखासाठी, जेणे करून त्यांच्यात अबाधित पणे तशी तशी धम्मवृद्धी व्हावी. अशा प्रकारे लोकांचे हित-सुखा कडे लक्ष देतो. सगे-संबंधी, निकटवर्तीय आणि दूरस्थ यांना सुख-प्राप्ति करवितो आणि तशीच व्यवस्था करवितो. अशाच प्रकारे मी सर्व समुहांकडे लक्ष देतो. मी सर्व संप्रदायांना विविध सन्मानाने पुजीले आहे. पण अशा रीतीने (लोकांपर्यंत) पोचणे हे मला महत्वाचे वाटते. अभिषेकानंतर सव्वीस वर्षांनी मी हा नीतीलेख लिहविला.
टिप – "अभिषेका नंतर बारा वर्षांनी" आणि "अभिषेका नंतर सव्वीस वर्षांनी" असे जे दोन उल्लेख येतात त्यातील पहिल्या उल्लेखात सम्राट अशोक इतिवृत्त सांगत आहे, कारण चौदा शिलालेखांची शृंखला अभिषेका नंतर बारा वर्षांनी लिहविली होती तर इतिवृत्त सांगणारा सदर लेख अभिषेका नंतर सव्वीस वर्षांनी लिहविला आहे.
स्तंभलेख ७ (पुर्वार्ध)
देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. खुप काळापूर्वीच्या राजांनाही इच्छा होती की जनतेत नीती-तत्व-वृद्धी (धंम्म-वृद्धी) ने विकास व्हावा, परंतू तद्अनुरुप नीती-तत्व-वृद्धी (धंम्म-वृद्धी) व विकास झाला नाही. तेंव्हा देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला, मला असे वाटते कि, खुप काळापूर्वीच्या राजांनाही जर इच्छा होती की जनतेत नीती-तत्व-वृद्धी (धंम्म-वृद्धी) ने विकास व्हावा, परंतू तद्अनुरुप नीती-तत्व-वृद्धी (धंम्म-वृद्धी) व विकास झाला नाही, तर मग जनतेने कसे आचरण करावे ? जनतेत अनुरुप नीती-तत्व-वृद्धी, विकास कसा होइल ? कोणत्या कारणांनी (उपायांनी) (जनतेत) नीती-तत्व-वृद्धी निर्माण करावी ? तेंव्हा देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला, मला असे वाटते कि, (मी) धम्मोपदेश ऐकवावा, धम्माचरण शिकवावे. हे ऐकून जनता त्यानुसार आचरण करील व विकास पावेल, (आणि धम्म-वृद्धीत खुपच वाढ होइल.)$

$ - (आणि धम्म-वृद्धीत खुपच वाढ होइल.) - हे कंसातील वाक्य या सातव्या स्तंभालेखाच्या उत्तरार्धाची सुरवात आहे हे पूढील पानावर दिसेल. पूढील पानावर हे संपूर्ण वाक्य पुन्हा लिहीले असून या वाक्याचा पुर्वार्ध कंसात दिला आहे.

देहली - टोपरा स्तंभ - निम्न परिघ पृष्ठ मुळ ब्राम्हि लेख ७ (उत्तरार्ध)



येथे देवनागरी लिप्यांतर लिहीणे आवश्यक होते परंतु या पुस्तकातील पृष्ठांचा आकार लक्षात घेता ते सहज शक्य होणे नाही. म्हणून पुढील पृष्ठावर प्राकृत भाषेतील सार्थ वाक्य दिली आहेत. येथवरच्या ब्राम्हि लिपीच्या सहवासामुळे वाचकांना हे तितकेसे कठीण वाटणार नाही असा विश्वास वाटतो.

देहली-टोपरा स्तंभ – निम्न परिघ पृष्ठ – स्तंभलेख ७ - (उत्तरार्ध)
देवनागरी लिप्यांतरीत प्राकृत भाषेतील सार्थ वाक्ये

धंमवढीयाच बाढं वढिसति. एताये मे अठाये धंमसावनानि सावापितानि धंमनुसथिनि विविधानि आनपितानि. यथ (पुलि)सा पि बहुने जनसि आयता ए ते पलियोवदिसंति पि पविथलिसंति पि. लजूका पि बहुकेसु पानसतसहसेसु आयता ते पि मे आनपिता हेवंच हेवंच पलियोवदाथ जनं धंमयुतं. देवानंपिये पियदसि हेवं आहा. एतमेव मे अनुवेखमाने धंमथंभानि कटा धंममहामातान कटा धंम(सावने) कटे. देवानंपिये पियदसि लाजा हेवं आहा. मगेसु पि मे निगोहानि लोपापितानि छायापदानि होसंति पसुमुनिसानं अंबावडिक्या लोपापिता. अढकोसिक्यानि पि मे उदपानानि खनापापितानि निंसिढया च कालापिता. आपानानि मे बहुकानि तत तत कालापितानि पटीभोगाय पसुमुनिसानंस (लहुके) एस पटीभोगे नाम. विविधाया हि सुखायनाया पुलिमेहि पि लाजीहि ममया च सुखयिते लोके. इमं चु धंमानुपटीपती अनुपटीपजंतु ति एतदथा मे एस कटे. देवानंपिये पियदसि हेवं आहा. धंममहामाता पि मे ते बहुविधेसु अठेसु आनुगहिकेसु वियापटासे पवजितानं चेव गिहिथानं च सव (पासं)डेसु पि च वियापटासे. संघठसि पि मे कटे इमे वियापटा होहंति ति हेमेव बाभनेसु आजीविकेसु पि मे कटे इमे वियापटा होहंति ति निगंठेसु पि मे कटे इमे वियापटा होहंति नानापासंडेसु पि मे कटे इमे वियापटा होहंति ति पटिविसिठं तेसु तेसु ते..महामाता. धंममहामाता चु मे एतेसु चेव वियापटा सवेसु च अंनेसु पासंडेसु. देवनंपिये पियदसि लाजा हेवं आहा. एतेच अंनेच बहुका मुखा दानविसगसि वियापटासे मम चेव देविनं च सवसि च मे आलोधनसि ते बहुविधेन आ(का)लेन तानितानि तुठायतनानि पटी(पादयंति) हिद चेव दिसासु च. दालकानं पि च मे कटे अंनानं च देविकुमालानं इमे दानविसगेस वियापटा होहंति ति धंमापदानठाये धंमानुपटिपतिये. एस हि धंमापदाने धंमपटीपति च या इयं दया दाने सचे सोचवे मदवे साधम च लोकस हेवं वढिसति ति. देवानंपिये ...... लाजा हेवं आहा. यानि हि कानिचि ममिया सधवानि कटानि तं लोके अनूपटीपंने तं च अनुविधियंति. तेन वढिता च वढिसंति च मातापितिसु सुसुसाया गुलुसु सुसुसाया वयोमहालकानं अनुपटीपतिया बाभनसमनेसु कपनवलाकेसु आव दासभटकेसु संपटीपतिया. देवानंपिय .... दसि लाजा हेवं आहा. मुनिसानं चु या इयं धंमवढि वढिता दुवेहि येव आकालेहि धंमनियमेन च निझतियाच. तत चु लहु स धंमनियमे निझतिया व भुये. धंमनियमे चु खो एस ये मे इयं कटे इमानि च इमानि जातानि अवधियानि. अंनानि पि चु बहु(कानि) धंमनियमानि यानि मे कटानि. निझतिया व चु भुये मुनिसानं धंमवढि वढिता अविहिंसाये भुतानं अनालंभाये पानानं.

से एताये अथाये इयं कटे पुतापपोतिके चंदमसुलियिके होतु ति तथा च अनुपटीपजातु ति. हेवं हि अनुपटीपजातं हिदतपालते आलाधे होति. सतविसति वसाभिसितेन मे इयं धंमलिबि लिखापापिता ति. एतं देवानंपिये आहा. इयं धंमलिबि अत अथि सिलाथंभानि वा सिलाफलकानि वा तत कटविया एन एस चिलिठितिके सिया.

देहली - टोपरा स्तंभ – निम्न परिघ पृष्ठ – स्तंभलेख ७ (उत्तरार्ध)

मराठी भाषांतर

(हे ऐकून जनता त्यानुसार आचरण करील व विकास पावेल,)$ आणि धम्म-वृद्धीत खुपच वाढ होइल. यासाठी मी धंमोपदेश सांगीतले आहेत आणि धंम-अनुशासनाच्या विविध आज्ञा केल्या आहेत. त्याच प्रमाणे अनेक लोकांत जे (राजपुरुष) नेमले आहेत तेही (धम्म)विचार सांगतील आणि (धम्म)विस्तार करतील, तसेच रज्जुकही, जे पुष्कळ शत-सहस्त्र प्राण्यांमधे नेमले आहेत. मी आज्ञा दिली आहे की, धम्म-आयुक्त लोकांना (धम्म)विचार सांगतील. देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. हे अनुलक्षून मी धम्म-स्तंभ (तयार) केले आहेत, धम्म-महामात्र केले (नेमले) आहेत, धम्मोपदेश केले आहेत. देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. पशू व मानवांना छाया मिळावी म्हणून मी मार्गांवर वट-वृक्ष लावविले आहेत आणि अंब्याच्या बागा लावविल्या आहेत. अर्ध्या कोसावर विहीरी खोदविल्या आहेत आणि विश्राम-स्थळे करविली आहेत. पशू आणि मानवांच्या उपयोगासाठी अनेक ठिकाणी इथे-तिथे पाणवठे करविले आहेत. हे सारे उपभोग लहान आहेत. माझ्या पूर्ववर्ती राजांनी सुद्धा विविध सुखदायी (कार्यांने) माझ्या सारखेच लोकांना सुखावले होते. या धम्माचरणाचे अनुसरण करावे याच साठी मी असे केले आहे. देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. माझे धंममहामात्र प्रवज्जितांसाठी व गृहस्थांसाठी अशा अनेकाविध कल्याणकारी कार्यात व्याप्त आहेत आणि ते सर्व संप्रदायात व्याप्त आहेत. मी असे (आज्ञापित) केले आहे की, ते (धंममहात्र) संघकार्यात व्याप्त असतील याच प्रकारे मी (आज्ञापित) केले आहे की, ते ब्राम्हण व आजीवकांतही व्याप्त असतील. ते निःग्रंथात व्याप्त असतील असे मी (आज्ञापित) केले आहे. ते अनेक संप्रदायांत व्याप्त असतील. प्रत्येक विशिष्ठते प्रमाणे त्या त्या (संप्रदायांत) महामात्र (असतील). आणि अशा प्रकारे माझे धंममहामात्र या सर्व आणि अन्य सर्व संप्रदायांत व्याप्त असतील. देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. हे (धंममहामात्र) आणि अन्य अनेक मुख्य अधिकारी माझे आणि राणीचे दान वितरित करण्यात व्यस्त असतात. तसेच सर्व अंतःपुरातून अनेक प्रकारांनी संतुष्टीकारक प्रतिपादन केले जाते. अशा प्रकारे या

दिशेने मी (व्यवस्था) केली आहे की, (माझ्या) मुलांनी, व इतर राणी-पुत्रांनी धंमाचरणासाठी, धंमप्रतिपादनासाठी दान वितरण करावे. असे धंमाचरण, धंमप्रतिपादन आहे की दया, दान, सत्य, पावित्र्य, मृदूलता आणि भलेपणा लोकांमधे वृद्धींगत व्हावा.

देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. मी जे कांही भले काम केले आहे, लोकांनी त्याचे अनुकरण केले आहे आणि करीत रहातील. हे वाढत जाईल आणि वाढतच जाईल, माता-पित्यांची सेवा, गुरुंची सेवा, वयोवृद्धांचे अनुसरण, (तसेच) ब्राम्हण-श्रमण, हीन-दीन, नोकर-चाकर (यांच्या) प्रति सम्यक आचरण.

देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणाला. मानवांमधे धम्मवृद्धी दोन कारणांनी होते, धम्म नियमांनी आणि ध्यानधारणेने. धम्म नियमांनी थोडकी पण ध्यानधारणेने अधिकच. धम्म नियम असे कि जसे मी केले आहेत कि, अमुक अमुक प्राणि अवध्य आहेत. आणि इतरही अनेक ... धम्म नियम मी केले आहेत. परंतु ध्यानधारणेने मानवांमधे अधिकच धम्म-वृद्धी होते, जीवांची अहिंसा आणि प्राणांचा अ-वध (साधतो). म्हणून हे केले आहे की, पुत्र-प्रपुत्र (नातु) यांनी आणि चंद्र व सुर्य असे पर्यंत याचे अनुसरण व्हावे. असे अनुसरण केल्याने इहलोक व परलोक (सुख) प्राप्त होईल. अभिषेकानंतर सत्तावीस वर्षांनी मी हा धम्मलेख लिहविला आहे.देवांनाप्रिय असे म्हणतात, हा धम्मलेख जेथे शिलास्तंभ अथवा शिलाफलक असेल तेथे करावा (लिहावा) ज्यायोगे हा चिरस्थायी होईल.

सारनाथ स्तंभ-लेख

मुळ ब्राम्हि स्तंभ-लेख



देवनागरी लिप्यांतर

देवा ....
एल ....
पाट .... ये केनपि संघे भेतवे ए चु खो
भिखु वा भिखुनी वा संघ भाखति से ओदितानि दुसानि संनंधापयिया अनावाससि
आवासयिये हेवं इयं सासने भिखुसंघसिच भिखुनिसंघसिच विनपयितविये
हेवं देवानंपिया आहा हेदिसाच इका लिपि तुफाकंतिकं हुवाति संसलनसि निखिता
इकंच लिपि हेदिसमेव उपासकानंतिकं निखिपाथ ते पि च उपासके अनुपोसथं यावु
एतमेव सासनं विस्वंसयितवे अनुपोसथं च धुवाये इकिके महामाते पोसथाये
याति एतमेव सासनं विस्वंसयितवे आजानितवे च आवतके च तुफाकं आहले
सवत विवासयाथ तुफे एतेन वियंजनेन हेमेव सवेसु कोटिविसवेसु एतेन
वियंजनेन विवासापयाथा

मराठी भाषांतर

देवानांप्रिय .... असे .... पाटलिपुत्रात जे कोणी संघात फूट पाडतील आणि जे कोणी भिक्खु वा भिक्खुणी संघात दूषीत करतील त्यांना योग्य सल्ला समजावून शुद्ध करून घ्यावे, जे (संघात) फूट पाडतील त्यांस एकत्र आणावे आणि (संघाच्या योग्य निवासा) व्यतिरीक्त रहावयास द्यावे. अशा रीतीने भिक्खुसंघ आणि भिक्खुणीसंघ विनयानुसार (विनयपीटकातील नियमा नुसार) शुद्ध करावा, असे देवानांप्रियाने सांगीतले आहे. या लेखाची एक प्रत स्वतःजवळ ठेवावी कारण हे (सर्वांना) प्रसारीत व्हावे. याची एक प्रत उपसकां मधे प्रसारीत व्हावी आणि उपासकांनी त्याअनुसार आचरण करावे. या अनुशासनावर विश्वास ठेवून ते कायम आचरावे आणि प्रत्येक महामात्राने हे संरक्षीत (जपून) ठेवावे. अशा रीतीने या अनुशासनावर विश्वास ठेवावा व जाणून घ्यावे म्हणून हे तुम्हास दिले आहे. आपण जेथे जेथे विहारासाठी जाल तेथे तेथे ही प्रत जवळ बाळगावी. हे पत्रक सुदूर प्रदेशासाठी (दूरवरच्या प्रदेशातील लोकांसाठी) देखील आहे (म्हणून) हे दूरवरच्या प्रवासातही जवळ बाळगावे.

रुम्मिनदेई (लुंबिनी) स्तंभ छायाचित्र



टिप : या स्तंभाचे प्रत्यक्ष छायाचित्र वर दिसते आहे. यावरील लेखातील बहुतेक शब्दांत आधुनिक लेखन पद्धति सारखे अंतर सोडलेले आढळते. आणि बहुतेक सर्वच स्तंभालेखात शब्दांत आधुनिक लेखन पद्धति सारखे अंतर सोडलेले आढळते.

देवनागरी लिप्यांतर

देवानंपियेन पियदसिन लाजिन वीसतिवसाभिसितेन
अतन आगाच महीयते हिदबुधेजाते सक्यमुनीति
सिलाविगडभीचाकालापित सिलाथभेच उसपापिते
हिदभगवंजातेति लुंमिनिगामे उबलिकेकटे
अठभागियेच

मराठी भाषांतर

देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा अभिषेकानंतर वीस वर्षांनी स्वतः (येथे) आला. पृथ्वीवर येथे शाक्यमुनी बुद्ध जन्मले. त्यांनी शिला-कारां कडून येथे शिला-स्तंभ उभारला. येथे भगवान जन्मले म्हणून लुंबीनी गावास आठव्या भागा पर्यंत करमुक्त केले.

निगलिवा स्तंभ मुळ ब्राम्हि लेख

निगलीवा स्तंभावरील लेखाच्या छायाचित्रावरून तयार केलेले रेखाचित्र



रेखाचित्र निर्मीती - अशोक तपासे.

देवनागरी लिप्यांतर

देवनंपियेन पियदसिन लाजिन चोदसवसा(भिसितेन)
बुधस कोनाकमनस थुबे दूतीयंवढिते
(विसतिव)साभिसितेनच अतनआगाचमहीयते
(सिलाथभे च उस)पापिते

(कंसातील लहान अक्षरे मुळ ब्राम्हि रेखाचित्रात दिसत नाही कारण छायाचित्र काढण्यापुर्वीच हा स्तंभ क्षतिग्रस्त झालेला आहे.)

मराठी भाषांतर

देवानांप्रिय प्रियदर्शी राजाने अभिषेकानंतर चौदा वर्षांनंतर कोणागमना बुद्धांचा स्तुप दुप्पट वाढविला. अभिषेकानंतर वीस वर्षांनंतर स्वतः आले. शिलास्तंभ उभारला.

आपण पाहिले की या लेखांची लिपी बादशहा अकबराच्या कारकिर्दीपर्यंत अनाकलनीय होउन राहीली होती. ती त्यापुर्वीच कधीतरी विस्मृतीत गेली असावी. जेंव्हा भारतात ब्रिटीशांची राजवट आली व स्थिरावली तेंव्हा या स्तंभांकडे, त्यावरील लेखनाकडे सर्वप्रथम ब्रिटीश अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले. हे लेखन कदाचित इसवीसनाच्याही पुर्वीचे असावे असे त्यांच्या लक्षात आले. या ऐतिहासीक लेखनाचे वाचन करण्यासाठी त्यांनी भारतातील अनेक विद्वानांशी संपर्क केला. पण असा कोणीही विद्वान त्यांना आढळला नाही. एकोणीसाव्या शतकाच्या सुरवातीस अनेक युरोपियन विद्वान या लिपीचे आकलन करण्यासाठी प्रयत्न करु लागले. सुरवातीस वाराणसीतील टांकसाळीत व नंतर कोलकत्त्यातील टाकसाळीत अधिकारी असलेले जेम्स प्रिंसेप हे नाणे-धातु तज्ञ या कामी परिश्रम करु लागले. ब्रिटीश सैन्यातील अधिकारी आणि पौरात्य इतिहासाचे तसेच भारतातील पुरातन वस्तुंचे अभ्यासक सर अलेक्झांडर कनिंघहॅम यांचे जेम्स प्रिंसेप यांच्याशी सख्य जुळले होते. जेम्स प्रिंसेप सुरवातीस भारतातील पुरातन नाण्यांवरील लिपीचा शोध घेत होते. वायव्य प्रांतात मिळालेल्या नाण्यावर द्विभाषी अक्षरे असल्याचे प्रिंसेपच्या लक्षात आले. या दोहोपैकी एक भाषा ग्रीक होती, त्यामुळे दुसऱ्या लिपीच्या अक्षरांची जुळणी सुलभ झाली. ही लिापी खरोष्टी होती. भारतात सापडलेली नाणी द्विभाषी नव्हती. शिवाय यावरील अक्षरसंख्या कमी होती. त्यामुळे यांचे आकलन कठीण होते. कनिंघहॅम यांनी सांची आणि अमरावती स्तुपाच्या परिसरात मिळालेल्या अनेक लेखांची चित्र प्रिंसेप यांना उपलब्ध करुन दिली. स्तुपाजवळ मिळालेल्या एकेका ओळीच्या अनेक लेखांची अखेरची दोन अक्षरे सारखीच असल्याचे लक्षात आले. अनेक बाजुंनी विचार केल्यानंतर ही अक्षरे कदाचित “दान” असावीत असा कयास बांधून त्या दिशेने संशोधन केले आणि या लिपीचे आकलन होऊ लागले. कनिंघहॅम यांनी

अशोकाच्या अनेक शिलालेखांची रेखाचित्रे प्रिंसेप यांना पुरविली. अधिक अक्षरांच्या उपलब्धते मुळे आकलन सोपे झाले. या लिपीतील सर्व अक्षरांचा शोध तर लागलाच पण त्यामुळे “देवानंपिय पियदसि” नावाचा कोणी सम्राट इथे होउन गेला होता असे ज्ञात होउ लागले. या देवानंपिय पियदसिचा शोध घेण्यासाठी इथल्या पुरातन वाङमयाचा शोध घेतला गेला पण पियदसि सापडला नाही. ब्रिटीशांनी मग या पियदसिचा शोध त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शेजारी राष्ट्रात केला. श्रीलंकेतील महावंस या पालि वाङमयीन लेखनात तो सापडला. या सम्राटाचे नाव “असोक” असल्याचे कळले.

या लिपीचा शोध लागल्यावर या लिपीच्या नावाचाही शोध घेतला गेला. भारतातील इतर कोणत्याही साहित्यात लिपी सदृश संकेत मिळाले नाहीत. असे संकेत फक्त अर्धमागधी जैन साहित्यात आणि संसकृत बौद्ध साहित्यात मिळाले. जैन “पन्नावन्न सुत्त“ आणि “भगवति सुत्त“ या साहित्यात लिपींची नावे मिळाली. त्याच बरोबर बौद्ध साहित्य “ललितविस्तर” मधेही लिपींची नावे मिळाली. या नावांत आणि दोन्ही साहित्यात ब्राम्हि/बंभि आणि खरोष्टी ही नावे सारखीच होती. चिनी प्रवासी फाहियान याने त्याच्या भारतभ्रमणाच्या वर्णनात येथील दोन लिप्यांचा उल्लेख केला होता. फाहियानच्या मते पहिली लिपी डावीकडून उजवीकडे लिहीली जाते तर दुसरी लिपी उजवीकडून डावीकडे लिहीली जाते. उजवीकडून डावीकडे लिहील्या जाणाऱ्या लिपीचा शोध यापुर्वीच लागला होता, व या कामी देखील जेम्स प्रिंसेपचा सिंहाचा वाटा होता. म्हणुनच या लिपीला खरोष्टी व नव्याने शोध लागलेल्या लिपीला बंभि/ब्राम्हि म्हटले गेले. अलेक्झांडर कनिंघहॅमनी मात्र या लिपींना अरियानो-पालि आणि इंडो-पालि म्हटले. याच लिपीची अनेक रुपे अनेक शिलालेखात मिळाली. परंतु ही रुपे देवानंपिय पियदसि नंतर अनेक शतकांनी तयार झालेली होती. एकोणीसशे पंधरा मधे कर्नाटकात

सोन्याच्या खाणींचा शोध घेणाऱ्या सि.बिडॉन नावाच्या खाण-अभियंत्याला मास्कि या गावाजवळ अशा शिलालेखाचा शोध लागला ज्यात “देवानंपिय असोकस” असे लिहीलेले आढळले. हे शिलालेख लिहीणारा सम्राट अशोक हाच आहे याचा सबळ पुरावा उपलब्ध झाला.

सम्राट अशोकाच्या काळात त्याच्या शिलालेख आणि स्तंभलेखांच्या स्वरुपात या लिपीतील विपुल लेखन मिळाले. त्या नंतरच्या काळातही कांही शतके हीच लिपी लेणीमधील व अन्य प्रस्तर लेखांतुन दिसली.

या लिपीचा शोध आणि त्यातुनच इतिहासातून लोप पावलेल्या या सम्राटाचा अर्थात सम्राट अशोकाचा शोध यात अनन्य साधारण एकरुपता आहे. या लिपीचा शोध लागला नसता तोवर सम्राट अशोक या देशात होउन गेलेला सर्वश्रेष्ठ सम्राट होता हे सत्य उजेडात आले नसते तर या सम्राटाने असे विपुल लेख भारतभर कोरुन ठेवले नसते तर अशी कोणती लिपी कधी काळी अस्तित्वात होती हे सत्यही कधीच प्रकट झाले नसते. म्हणून या लिपीला “अशोक लिपी” म्हणणे सर्वतोपरी योग्य आहे असे मला वाटते.

अशोक तपासे

०१ डिसेंबर २०१९

मुखपृष्ठावरील छायाचित्र :

सर्व स्तंभविशेष सुस्थितीत असलेला
सम्राट अशोकाचा लौरिया नंदनगढ स्तंभ
शेजारी उभी हर्षदा तपासे.